# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com

फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in

**महत्त्वाचे**

संदर्भ क्र:- तंशिस/विकाना/शैवि-२/पदविका/२०१६/ 1368

दिनांक:- 12 MAY 2016

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**
**सर्व अभियांत्रिकी पदविका संस्था,**
**नागपूर विभाग, नागपूर**

**विषय:- विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं. १०/एनजीपी/व्हीजेएनटी माहिती/२०१६/४७०, दि. १० मे २०१६

उपरोक्त संदर्भाकिंत पत्रान्वये कळविण्यांत येते की, शासनाने (पत्र क्रमांक - संकिर्ण-२०१६/प्र.क्र.६४ / १६/ आस्था-२, दि. १९ मार्च २०१६) शैक्षणिक वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या मागील पाच वर्षामधील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यांत आलेली आहे.

तरी या विभागाअंतर्गत येणाऱ्या **सर्व अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये माहिती या कार्यालयास दि. १५ मे २०१६ पर्यंत हस्तदेय सॉफ्ट (Excel Sheet मध्ये) ) व हार्ड कॉपी मध्ये सादर करण्यांत यावी.** जेणे करून सदर माहिती शासनास लवकरात लवकर सादर करणे सोईचे होईल.

(गुलाबराव ठाकरे)
**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**नागपूर**

**प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.**

# *** प्रपत्र ***

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील
उत्तीर्ण झालेल्या मागील पाच वर्षातील (शैक्षणिक वर्ष २०१०-११ ते २०१४-१५) विद्यार्थ्यांची माहिती

**संस्थेचे नाव:-**

**डिटीई कोड:-**

| अ. क्रं. | शैक्षणिक वर्ष | अंतिम पदविका परीक्षेस बसलेले एकुण विद्यार्थी | अंतिम पदविका परीक्षेस बसलेले एकुण विमुक्त जाती (VJ) (DT) प्रवर्गाचे विद्यार्थी संख्या | अंतिम पदविका परीक्षेस बसलेले एकुण भटक्या जमाती (NT) प्रवर्गाचे विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण झालेले एकुण विमुक्त जाती (VJ) (DT) प्रवर्गाचे विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण झालेले एकुण भटक्या जमाती (NT) प्रवर्गाचे विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २०१०-११ | | | | | |
| २ | २०११-१२ | | | | | |
| ३ | २०१२-१३ | | | | | |
| ४ | २०१३-१४ | | | | | |
| ५ | २०१४-१५ | | | | | |

**सही:-**
**पदनाम:-**

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website : www.dtemaharashtra.gov.in


<u>तात्काळ</u>

जा. क्र. १०/एनजीपी/व्हीजेएनटी माहिती/२०१६/ ८७०

दिनांक : 10 MAY 2016

प्रति,

**सहसंचालक**

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**

**अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे**

विषय- विमुक्त जाती, भटक्या जमातीबाबत प्रवर्गातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत. . .

संदर्भ- शासनपत्र क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.६४/१६/आस्था-२, दि. १९.०३.२०१६

महोदय

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन शासन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या मागील पाच वर्षामधील पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यामधील विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात आलेली आहे. सदरची माहीती महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून मागविण्यात आलेली होती. परंतु सदर कालावधीतील प्रवर्गनिहाय माहिती मंडळाकडे उपलब्ध नसल्यामुळे सदरहु माहिती प्राप्त झालेली नाही.

तरी आपणांस कळविण्यात येते की, सदरहु माहिती शासनास सादर करावयाची असल्यामुळे आपले विभागांतर्गत असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून सोबत देण्यात आलेल्या प्रपत्रानुसार माहिती तात्काळ उपलब्ध करुन घेण्यात यावी. संस्थाकडून प्राप्त झालेली माहिती आपले स्तरावर एकत्रित संकलित करुन सदरहु माहिती या संचालनालयास दि. १९.०५.२०१६ पर्यत उपलब्ध करुन देण्यात यावी.

आपला

( डॉ. सुरेश रावलकर )

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई

सोबत-प्रपत्र